<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १/२०२३</u>

निशाण क्र. ०६ लगत

सरकारतर्फे साक्षीदार क्र. १ ची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – संतोष भिकाजी गावकर

वय – ३२ वर्षे, धंदा – शेती

निवासस्थान – अणसुरे आडीवाडी, ता. राजापूर जि. रत्नागिरी

**<u>शपथेवर सरतपासणी सरकारतर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्री.माजगावकर यांचेमार्फत–</u>**

१. दि. २०/१०/२०२२ रोजी माझी भाऊ दिनेश भिकाजी गावकर हा देवगडवरुन मोटरसायकल क्र. एमएच–०८–एएम–५०९८ वरुन घरी अणसुरे येथे येत होता. कोंडामा तिठ्ठा येथे एका सुमोने त्याच्या मोटरसायकलीला धडक दिली. मला पडेल येथील नातेवाईकांनी संध्याकाळी ७.३० वा. फोन करुन घटनेबाबत सांगितले. त्यानंतर आम्ही पडेल येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात गेलो. तेथे एमएच–०६–डब्ल्यू–६३४९ या क्रमांकाची लाल रंगाची एक चारचाकी गाडी होती. त्या गाडीत माझा भाऊ होता. पडेल येथे त्याच्यावर उपचार केले नाहीत. तेथून माझ्या भावाला देवगड येथे सरकारी दवाखान्यात उपचारासाठी आणले. तेथील डॉक्टरांनी माझा भाऊ मयत असल्याचे सांगितले. सुमो गाडीने धडक दिल्याने सदरचा अपघात झाला होता. सदरची गाडी शैलेश भगवान कानडे हा चालवित होता. त्यानंतर त्याच दिवशी मी देवगड पोलीस स्टेशनला घटनेबाबत फिर्याद दिली. आता मला सदरची फिर्याद दाखविली. ती तीच असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी क्र. १३</u>** देण्यात येते. सुमो चालकाला मी ओळखत नाही.

सरतपास पुर्ण.

**<u>आरोपी तर्फे उलट तपास विधिज्ञा श्रीमती एस.एस.कालेकर यांचेमार्फत सुरु.</u>**

२. हे खरे आहे की, घटना मी प्रत्यक्ष पाहिली नाही व मला सर्व काही पोलीसांकडून कळाले होते. पडेल येथे माझ्या भावावर उपचार केले नाहीत असे मी पोलीसांना सांगितले नव्हते. हे खरे नाही की, मी सरतपासातील मजकूर खोटा सांगितला आहे. हे खरे आहे की, भाऊ मयत झाल्यामुळे नुकसान भरपाईबाबत मी केस दाखल केली आहे. हे खरे नाही की, मी खोटी फिर्याद दाखल केली आहे.

उलट तपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

(श्रीमती एन.बी.घाटगे)

दि. १९/०३/२०२४

न्यायंडाधिकारी वर्ग–१, देवगड

<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ०१/२०२३</u>

निशाण क्र. ०६ लगत

सरकारतर्फे साक्षीदार क्र. २ ची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – संजय रघुनाथ गावकर

वय – ५६ वर्षे, धंदा – शेती

निवासस्थान – रा. पडेल ता. देवगड, जि. सिंधुदूर्ग

**<u>शपथेवर सरतपास सरकारतर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्री.माजगावकर यांचेमार्फत–</u>**

१. दि. २०/१०/२०२२ रोजी विजयदुर्ग पोलीसांनी मला कोंडामा तिठ्ठा येथे पंचनाम्यासाठी बोलविले होते. मी तेथे गेलो होतो त्या ठिकाणी संतोष गावकर, मुकेश मोहन गावकर व पोलीस होते. तेथे एक चारचाकी व एक दुचाकीचा अपघात झाला होता. घटनास्थळी दुचाकी होती. त्याचे हेड लाईट, इंडिकेटर फुटलेले होते व ब्रेकचे पायडल तुटलेले होते. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा माझ्या समक्ष केला होता. घटनास्थळ हे देवगड बाजूला कोंडामा तिठ्ठयापासून ५० मीटर अंतरावर होते. मी तो वाचला होता. त्यानंतर मी त्यावर सही केली. आता मला तो पंचनामा दाखविला. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास निशाणी क्र. १४ देण्यात येते.

सरतपास पुर्ण.

**<u>आरोपी तर्फे उलट तपास विधिज्ञ श्रीमती एस.एस.कालेकर यांचेमार्फत सुरु.</u>**

२. हे खरे आहे की, मी पडेल गावचा रहिवाशी आहे. घटनास्थळ हे माझ्या घरापासून चार किलोमिटर अंतरावर आहे. अपघातग्रस्त हे माझे नातेवाईक असल्याने मी घटनास्थळी गेलो होतो. हे खरे आहे की, ऑक्टोबर महिन्यात लवकर रात्र होते. हे खरे आहे की, घटनास्थळावरील रस्ता अरुंद आहे. हे खरे आहे की, घटनास्थळ हे चढ उताराचे आहे. हे खरे आहे की, त्यामुळे समोरुन येणा–या गाडीचा लाईट थेट डोळयांवर पडतो. हे खरे आहे की, घटनास्थळाच्या भागात राहत असल्यामुळे घटनास्थळाची परिस्थिती मला माहित आहे. हे खरे आहे की, घटनास्थळी बरेच लोक जमले होते. हे खरे आहे की, मी मजकूर सांगितला व तो पोलीसांनी पंचनाम्यात लिहून घेतला असे काही घडले नाही. हे खरे आहे की, मयत माझा नातेवाईक असल्याने त्याला मदत करण्यासाठी मी पंचनाम्यावर सही केली. हे खरे नाही की, मी खोटा पंचनामा करुन खोटी सही केली आहे. हे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

(श्रीमती एन.बी.घाटगे)

दि. १९/०३/२०२४

न्यायंडाधिकारी वर्ग–१, देवगड